महाराष्ट्र शासन

# ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नगर भवन, मुंबई - ४०० ००१

दूरध्वनी क्र. :- ०२२-२२६६४६३८ / २२६७१३३३ फॅक्स क्र. :- ०२२-२२६४४६३८
वेबसाईट :- www.dol.maharashtra.gov.in ई-मेल :- director.dol@maharashtra.gov.in

जा.क्र. : ५५/वाहन लिलाव /२०२२-२३/ ६७७८ दिनांक : ०२/०९/२०२२

## दरपत्रक

## वाहन लिलाव विक्रीची सूचना

ग्रंथालय संचालनालय कार्यालयाच्या निर्लेखित वाहनाच्या विक्रीकरिता विहित नमुन्यात (परिशिष्ट-१) इच्छित व्यक्ती/संस्था यांच्याकडून देकार मागविण्यात येत आहे.

२. विक्री करावयाचे वाहन क्रमांक MH-01-ZA-0049 मुंबई येथील ग्रंथालय संचालनालय, नगर भवन, शहिद भगत सिंग रोड, फोर्ट, मुंबई – ०१ च्या शासकीय इमारतीच्या आवारामध्ये ठेवण्यात आले असून दिनांक ०६/०८/२०२२ ते १२/०८/२०२२ या कालावधीत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत पाहणीसाठी उपलब्ध असेल.

३. विक्री करावयाच्या वाहनाचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | वाहन नोंदणी क्रमांक | वाहनाचा प्रकार | किमान मुल्य (हातची किंमत रूपयांत) | अनामत रक्कम (रूपयांत) |
|---|---|---|---|---|
| १ | MH-01-ZA-0049 | Tata Indigo CS BS-III, Petrol | ३६,७५६/- | ५,०००/- |

**४. लिलाव विक्रीच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे :-**

४.१ वाहन जेथे आहे, ज्या अवस्थेत आहे त्याच अवस्थेत घ्यावे लागेल.

४.२ ज्या संस्थेचा / व्यक्तीचा देकार मंजूर करण्यात येईल अशा संस्थांनी / व्यक्तींनी वाहन कार्यालयाच्या आवारातून बाहेर नेताना वाहतुकीचा, हमालीचा व इतर हाताळणीचा खर्च स्वत: सोसावयाचा आहे.

४.३ निर्लेखित वाहन कार्यालयीन इमारत / आवारातून बाहेर नेताना कार्यालयीन मालमत्तेचे / वस्तूंचे नुकसान झाल्यास मालमत्तेच्या नुकसानीची भरपाई संबंधित दरपत्रधारकाकडून रोखीच्या स्वरूपात त्याच ठिकाणी वसूल करण्यात येईल.

४.४ ज्या संस्थेने / व्यक्तीने सादर केलेले लिलावाचे दर सर्वात जास्त असतील अशा पक्षकाराने लिलावाची संपूर्ण रक्कम दरपत्रके उघडल्यानंतर दुसऱ्या कार्यालयीन दिवशी डिमांड ड्राफ्टव्दारे कार्यालयात भरणा करणे बंधनकारक राहील.

४.५ दरपत्रकासोबत इसारा ठेव (EMD) रूपये ५,०००/- (अक्षरी रूपये पाच हजार मात्र) डिमांड ड्राफ्टव्दारे ग्रंथालय संचालनालय (DIRECTOR OF LIBRARIES) या नावाने सादर करणे अनिवार्य आहे.

४.६ कोणतेही कारण न देता दरपत्रक स्वीकृत करणे अथवा नाकारण्याचा अधिकार ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांनी राखून ठेवला आहे.

४.७ सदर दरपत्रकाच्या अटी व शर्ती शिथीलक्षम करण्यास ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य सक्षम आहेत. दरपत्रकाच्या अटी व शर्ती शिथीलक्षम करण्यास ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांचा निर्णय अंतिम राहिल व तो दरपत्रक धारकावर बंधनकारक राहील.

४.८ सशर्त दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत.

४.९ दरपत्रके उघडल्यानंतर कार्यालयाने अंतिम केलेल्या हातच्या किंमतीपेक्षा (अपसेटप्राईस) जास्तीत जास्त दर नमुद केलेले देकार स्वीकृत केले जाईल.

४.१० दरपत्रकधारकांची ईसारा ठेव (EMD) खालीलपैकी कोणत्याही प्रकरणी जप्त केली जाईल.

(१) दरपत्रक स्विकारण्याच्या अंतिम दिनांकानंतर दरपत्रक मागे घेतल्यास.

(२) दरपत्रक स्विकारण्यात आल्यानंतर (मंजूर झाल्यानंतर) आवश्यक खरेदी किंमत स्वीकृतीच्या दुसऱ्या दिवशी न भरल्यास.

(३) रक्कम भरल्यानंतर यशस्वी दरपत्रक धारकाने वाहन ताब्यात घेण्यास नकार दिल्यास.

Scanned with CamScanner

४.११ विहित मुदतीत रक्कम भरून वाहन ताब्यात न घेतल्यास संबंधितांचा देकार रद्द ठरवून विक्री अन्य पात्र संस्थेस / व्यक्तीस करण्याचे अधिकार ग्रंथालय संचालकांना राखून ठेवण्यात येत आहे.

**४.१२ वस्तु व सेवा कर अधिनियमानुसार, यशस्वी दरपत्रकधारकास आवश्यक तो १८% वस्तु व सेवा कर(GST) भरेणे आवश्यक.**

४.१३ दरामध्ये तसेच दरपत्रक कागदपत्रात कोठेही खाडाखोड, Overwriting पांढरी शाई लावणे टाळावे. चुकून तसे करावे लागल्यास पुर्ण स्वाक्षरी करावी . तसे न केल्यास दरपत्रक रद्द करण्याचे अधिकार ग्रंथालय संचालकांना राखून ठेवले आहेत.

४.१४ शासकीय वाहनाच्या हस्तांतरण नोंदणीबाबतसर्व प्रक्रिया यशस्वी दरपत्रकधारकास स्वखर्चाने करावी लागेल.

**५. दरपत्रक सादर करण्याची पध्दत :-** दरपत्रक दोन लिफाफा पध्दतीने सादर करावा.

**५.१ लिफाफा क्र. १ — (तांत्रिक लिफाफा) :-**

(१) दरपत्रक धारक फर्म किंवा संस्था असल्यास (अ) संबंधीत शासकीय विभागाचे नोंदणी प्रमाणपत्र (उदा. शॉप ऍक्ट रजिस्ट्रेशन किंवा तत्सम रजिस्ट्रेशन ) (ब) दरपत्रक धारकाचे दिनांक २१ जुलै, २०२२ रोजी वैध असलेल्या जीएसटी नोंदणी प्रमाणपत्राची प्रत (२) दरपत्रक धारकाचे पॅनकार्ड, आधार कार्डची स्वसाक्षांकित प्रत (३) इसारा ठेव (EMD) डिमांड ड्राफ्ट रूपये ५,०००/-

**५.२ लिफाफा क्रमांक — २ (आर्थिक देकार)**

दरपत्रक धारकाने सोबतच्या विहित प्रपत्रात (परिशिष्ट-१) जास्तीत जास्त किंमतीचे देकार अंकी व अक्षरी नमुद करावेत तसेच स्वाक्षरी करून लिफाफा क्रमांक २ मध्ये सीलबंद करावा.

५.३ वरील दोन्ही लिफाफा (तांत्रिक व आर्थिक) एका स्वतंत्र लिफाफयामध्ये (मुख्य लिफाफा) सीलबंद करून लिफाफ्यावर "**वाहनाचा (वाहन क्रमांक) खरेदी करीता देकार**" असे ठळकपणे नमुद करावे. तसेच सदर मुख्य लिफाफा मा. ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नगर भवन, शहिद भगत सिंग रोड, फोर्ट, मुंबई — ४०० ००१ यांना अग्रेषित करावा.

**५.४ मुख्य लिफाफ्यावर दरपत्रक सादर करणाऱ्या संस्थेचे नाव, पत्ता, ई-मेल व संपर्कासाठी दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक लिहावा.**

**६. दरपत्रक उघडण्याची पध्दत :-** दरपत्रक उघडते वेळी प्रथम दरपत्रकाचा लिफाफा क्रमांक १ (तांत्रिक) उघडण्यात येईल. सादर लिफाफ्या मधून विहित कागदपत्रांची पूर्तता केलेली नसल्यास दरपत्रक धारकाचा लिफाफा क्रमांक २ उघडला जाणार नाही.

७. कोणतेही दर मंजुर वा रद्द करणे तसेच लिलावाची कार्यवाही कोणत्याही स्तरावर थांबविणे हे कार्यालयाचे हक्क अबाधित राहतील तसेच याबाबत कोणतीही कारणमीमांसा केली जाणार नाही.

८. ज्या संस्था / व्यक्ती यांना लिलावाच्या अटी व शर्ती मंजूर असतील अशा संस्था / व्यक्तींनी लिलावात सहभागी होण्यासाठी आपले दर बंद लिफाफ्यातून ग्रंथालय संचालनालयाच्या पत्यावर कोणत्याही परिस्थीतीत दिनांक १२/०८/२०२२ रोजी संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत प्राप्त होतील अशा रितीने स्वत: उपस्थित राहून किंवा रजिस्टर पोस्टाने पाठवावे.

९. बंद लिफाफे उघडण्याचा वेळ, दिनांक व ठिकाण संबंधीतांना ई-मेलव्दारे/भ्रमणध्वनी व्दारे कळविण्यात येईल.

शागोइंगोले

(शालिनी गो. इंगोले)

**प्र. ग्रंथालय संचालक,**

**महाराष्ट्र राज्य**

Scanned with CamSca

## परिशिष्ट - १

दरपत्रक सादर करण्याकरीता प्रपत्र (दरपत्रक धारकाच्या लेटर हेडवर)

**दिनांक :**

प्रति,
मा. ग्रंथालय संचालक,
ग्रंथालय संचालनालय,
महाराष्ट्र राज्य,नगर भवन,
शहिद भगतसिंग रोड, फोर्ट,
मुंबई – ४०० ००१.

**कामाचे नाव :- वाहनाची खरेदी करण्याबाबत.**
**लिलाव विक्रीची सूचना क्रमांक :-**

महोदया,

मी / आम्ही उपरोक्त नमूद केलेले काम लिलाव विक्री सूचनामधील अटी व शर्ती यांच्या अधिन राहून तसेच लिलाव विक्री सूचनामध्ये नमुद विनिर्दिष्ट कामाकरीता अदा करण्यात येणाऱ्या देय रक्कमेचा विचार करून खाली दर्शविलेल्या दरानुसार खरेदी कार्यन्वित करण्यासाठी प्रस्तावित करीत आहे/आहोत.

| अ.क्र. | वाहन नोंदणी क्रमांक | वाहनाचा प्रकार | प्रस्तावित दर (रूपये) |
|---|---|---|---|
| १. | MH-01-ZA-0049 | Tata Indigo CS | |

आम्ही लिलाव विक्रीची सूचना, लिलावाने विक्रीच्या अटी व शर्ती तसेच ग्रंथालय संचालनालयाचे नियम आणि कायदे वाचले असून ते आमच्यावर बंधनकारक आहेत.

आपला/आपली विश्वासू,

दरपत्रक धारकाची स्वाक्षरी

दिनांक :

नाव :

पत्ता:

साक्षीदार :

Scanned with CamSca